# ओएनजीसी (डब्ल्यूओयू) कर्मचारी संघटना

## मान्यताप्राप्त युनियन

बंधू-भगिनींनो,

आपणांस ज्ञात आहेच कि ऑफशोअरमधील कर्मचाऱ्यांना सर्वोत्तम कॅटरींग सेवा मिळण्याकरीता कर्मचारी संघटनेने मॅनेजमेंटच्या सहकार्याने अत्यंत काटेकोरपणे कॅटरींग कॉन्ट्रॅक्टचा मसूदा बनविलेला आहे. या कॅटरींग कॉन्ट्रॅक्टमध्ये कॅटरर्सच्या मनमानी कारभाराला आळा बसावा तसेच कॅटरींगचे बिल पास होण्याकरीता काही ठराविक व्यक्तींच्या हाती अधिकार न ठेवता तो प्लॅटफॉर्मवरील सर्व स्तरातील कामगाराच्या हाती देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. सदर सेवा कर्मचाऱ्यांना व्यवस्थित व सुरळीतपणे पुरविण्यासाठी कॅटरींग कॉन्ट्रॅक्टरला समाधानकारक रक्कम देखील या कॉन्ट्रॅक्टमध्ये वाढवून देण्यात आलेली आहे.

असे असताना बीएचएस प्लॅटफॉर्मवरील कॅटरींगच्या अनेक तक्रारी कर्मचारी संघटनेकडे आलेल्या होत्या. या तक्रारी सुधारण्यासाठी बीएचएस प्लॅटफॉर्मवरील फुड कमिटीने कॅन्टीन कॉन्ट्रक्टरला ठराविक मुदत दिली होती परंतु या दिलेल्या मुदतीत कॅन्टींग कॉन्ट्रक्टरने कोणतीही सुधारणा न केल्यामुळे कॉन्ट्रक्ट मधील तरतुदीनुसार सदर फुड कमीटीने कॅन्टींग बिला मधील अनेक पॉईंट्स कापले होते. सदर घटनेने अस्वस्थ झालेले या प्लॅटफार्मचे लोकेशन मॅनेजर श्री. श्रीवंत सिंह यांनी प्लॅटफॉर्मवर जावून सदर कमिटीवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला तसेच अशा प्रकारचे कृत्य केल्यास ट्रान्सफर करण्याची धमकी देऊन जुनी कमिटी बरखास्त केली व आपल्या अधिकारात नविन कमिटी बनवून कापलेले पॉईंट्स रद्द करुन नविन बिल तयार करुन ते मॅनेजमेंटला सादर केले.

सदर संतापजनक प्रकार कर्मचारी संघटनेच्या निदर्शनास आल्यानंतर कर्मचारी संघटनेने त्वरीत श्री. श्रीवंत सिंह यांची भेट घेवून जुन्या कमिटीने जे बिल बनविलेले आहे ते जसेच्या तसे एफएमजी सेक्शनला पाठविण्याचा आग्रह केला तसेच जर अपुऱ्या सुविधांमुळे सदर कमिटीने बिलामधील पॉईंट्स कापले असतील तर एफएमजी समोर आपली बाजु मांडण्याचा कॅटरींग कॉन्ट्रक्टरला पूर्ण अधिकार असून व्यवस्थापनाने आपले हितसंबंध जपण्याकरीता आपल्या अधिकारात नसलेली ढवळाढवळ करु नये असी विनंती केली.

कर्मचारी संघटनेने केलेल्या विनंतीकडे श्री. श्रीवंत सिंह यानी जाणीवपूर्वक दुलर्क्ष केल्यामुळे कर्मचारी संघटनेने सदर बाब दिनांक ३ / ६ /२०१६ रोजी मा. श्री राजेश कक्कड, ईडी, एम. एच. ॲसेट यांच्या निदर्शनास आणून दिली. तसेच मा. श्री. राजेश कक्कड साहेबांनी या विषयाची गांभीर्याने दखल घेत त्याच दिवशी संध्याकाळी कर्मचारी संघटनेबरोबर सभा आयोजित केली. सदर सभेत श्री राजेश कक्कड, श्री टि. के. बॅनजी, श्री. श्रीवंत सिंह, श्री. नावेद राव व इतर अधिकारी उपस्थित होते. श्री. श्रीवंत सिंह यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना विश्वासात न घेता जी जुनी कमिटी बरखास्त करुन जुन्या कमिटीने मंजूर केलेले बिल रद्द केले, या बाबत सदर सभेमध्ये मा. श्री. राकेश कक्कड साहेबांनी आश्चर्य व्यक्त करित संतप्त होवून या प्रकाराबाबत श्री. श्रीवंत सिंह यांना जाब विचारला व प्लॅटफॉर्मवरील कर्मचाऱ्यांच्याशी विचार विनिमय करुन रद्द केलेल्या जुन्या बिलासंबंधी फेरविचार करण्याबाबत कडक शब्दात समज दिली.

या विषयानंतर एससीए प्लॅटफार्मवरील अनेक वर्ष प्रलंबीत असलेल्या समस्यांबाबत कर्मचारी संघटनेने दिलेल्या 'Hunger Strike' च्या नोटीशिनुसार मॅनेजमेंटने त्वरीत कारवाई करीत संबंधीत समस्या सुधारण्याबाबत समाधानकारक माहीती देऊन कामकाजाला सुरवात देखील केलेली आहे.

मित्रहो, आपण सर्वांनी एकजुटीने अन्यायाविरुध्द केलेला प्रतिकार तसेच कर्मचारी संघटनेवरील अतुट विश्वास याचमुळे हे शक्य झालेले असुन आपण प्रामाणिकपणे काम करित असताना आपल्या अधिकाराची जर कोणाकडून पायमल्ली होत असेल तर कर्मचारी संघटना ठाम पणे आपल्या पाठीशी आहे हे आम्ही आपणांस आश्वासन देत आहोत.

धन्यवाद.

**कर्मचारी संघटना झिंदाबाद !**

**कामगार एकता झिंदाबाद !!**

(प्रदीप मयेकर)

दि. ८ ऑगष्ट **२०१६**

सरचिटणीस